दिनांक:-01/06/2021

# प्रसिध्दी पत्रक

अमरजा मुकुंद शेखदार, वय ४२ वर्ष, ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, धारुर, ता.जि.उस्मानाबाद रा.७८/१, आर्यावर्त विद्यानगर, शेळगी, सोलापुर शहर, उत्तर सोलापुर (वर्ग- ३) खाते-(महसुल) यांनी तक्रारदाराकडे 8,000/- रुपये लाच रककम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळयात

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | अमरजा मुकुंद शेखदार, वय ४२ वर्ष, ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, धारुर, ता.जि.उस्मानाबाद रा.७८/१, आर्यावर्त विद्यानगर, शेळगी, सोलापुर शहर, उत्तर सोलापुर |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.01.06.2021 रोजी पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद येथे |
| तपासी अधिकारी | श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 8,000/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मयत वडील बलभिम अंबाजी गायकवाड यांचे नावावर असलेल्या धारुर-खामसवाडी शेत गट नं.१४१ मध्ये शासनाचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेमधुन मंजुर झालेल्या सिंचन विहीरीचे कुशल कामाचा निघालेला २६,६६७/- रुपयाचा चेक देण्यासाठी व पहिले निघालेल्या बिलाची राहिलेली बाकी असे |

यातील तक्रारदार यांचे मयत वडील बलभिम अंबाजी गायकवाड यांचे नावावर असलेल्या धारुर-खामसवाडी शेत गट नं.१४१ मध्ये शासनाचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेमधुन मंजुर झालेल्या सिंचन विहीरीचे कुशल कामाचा निघालेला २६,६६७/- रुपयाचा चेक देण्यासाठी व पहिले निघालेल्या बिलाची राहिलेली बाकी असे ग्रामसेवक अमरजा शेखदार यांनी तक्रारदार यांचेकडे 11,000/- रु लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि. 25.05.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस उप अधीक्षक, प्रशांत संपते यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.01.06.2021 रोजी अमरजा शेखदार, ग्रामसेवक यांची पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद येथे लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी 11,000/- रु लाचेची मागणी करुन तजोडीअंती 10,000/- रु लाचेची मागणी करुन नंतर 8000/- रु लाच रक्कम स्विकारण्यास संमत्ती दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे 01.06.2021 रोजी सापळयाचे आयोजन केले असता ग्रामसेवक अमरजा शेखदार यांनी तक्रारदार यांचेकडुन पंच साक्षीदारासमक्ष 8000/- रु लाच रक्कम फाईलमध्ये ठेवण्यास सांगुन स्वतः स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.उस्मानाबाद यांनी केली असुन सदर कारवाईस पोहेकॉ/दिनकर उगलमुगले, पांडुरंग डंबरे, पोना/अर्जुन मारकड, मधुकर जाधव, पोकॉ/विष्णु बेळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :-

1) मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

2) श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

3) टोल फ्री क्र. 1064, दूरध्वनी क्र.- 02472-222879

E-Mail ID:- dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

(प्रशांत संपते)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद